॥ सा विद्या या विमुक्तये॥
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
" ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र)
## SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
"Dnyanteerth" Vishnupuri, Nanded – 431 606, ( Maharastra )
Established on 17th September 1994 – Recognised by the UGC U/S 2(f) and 12 (B) NAAC Re-accredied with " A" Grade

DEPARTMENT OF EXAMINATION (ELLIGIBILITY SECTION)

Phone : ( 02462 ) 229 242, 229 243 Website : srtmun.ac.in

संदर्भ : पात्रता/२०१७–१८/ 125 दिनांक ३०/०६/२०१७

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालय,
प्रस्तूत विद्यापीठ, नांदेड.

विषय :– आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना परीक्षेला बसण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ :– मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांचे दिनांक १३ जून २०१७ रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार राज्यातील मान्यताप्राप्त व्यावसायिक व उच्च शिक्षण अभ्यासक्रमात शिकणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राज्य शिक्षण शुल्क योजनेंतर्गत लाभ देण्याकरीता पात्रतेसाठी कुटुंबाची वार्षिक आर्थिक मर्यादा रू. ६.०० लक्ष करण्यात आल्याचे कळविले असून विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यापासून वंचित ठेवण्यात येऊनये तसेच ईबीसी सवलती व इतर बाबीचा सदर पत्रामध्ये उल्लेख केला आहे.

उपरोक्त सदंर्भीय पत्र सोबत जोडण्यात आले असून सदर पत्रानुसार आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी.

संचालक
परीक्षा व मुल्याकंन

Examinations
S. R. T. M. University
Inword No. 745
Date 22/06/17

# महाराष्ट्र शासन

क्र.विसआ-२०१७/प्र.क्र.६७/तांशि-४,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
दालन क्र.४४१,मंत्रालय (विस्तार),
चौथा मजला,हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई-४०० ०३२
दिनांक : १३ जून, २०१७.

VICE-CHANCELLOR'S SECRETARIAT
S.R.T.MU. Nanded-431606
Inward No VCS-3127
Dt.of Received 20/6/17
Time Sign.

प्रति,
१.सर्व कुलगुरू,
सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
२.संचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य,
मुंबई ४०० ००१.

विषय :-आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना परीक्षेला बसण्यास परवानगी देण्याबाबत

शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.टीईएम-२०१६/प्र.क्र.५०१/तांशि-४, दि.१३.१०.२०१६ अन्वये राज्यातील मान्यताप्राप्त व्यावसायिक व उच्च शिक्षण अभ्यासक्रमात शिकणा-या **आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना** राज्य शिक्षण शुल्क योजनेंतर्गत लाभ देण्याकरिता पात्रतेसाठी कुटुंबाची वार्षिक आर्थिक मर्यादा रू.६.०० लक्ष करण्यात आली आहे.

२. त्यानुषंगाने पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन स्वरूपात अर्ज मागविण्यात आले असून सदर ईबीसी सवलतीसाठी पात्र लाभार्थ्यांची यादी तंत्र शिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येणार आहे. सदर यादीचे अवलोकन केल्यानंतरच विद्यार्थ्यांची पात्रता ग्राहय धरण्यात यावी. संस्थास्तरावर छाननी करून विद्यार्थी अपात्र असल्याबाबत निर्णय घेऊन **विद्यार्थ्यांना** परीक्षा देण्यापासून वंचित ठेवण्यात येऊ नये. तथापि, उपरोक्त यादीनुसार विद्यार्थी अपात्र आढळल्यास त्याच्याकडून संबधित विषयाचा निकाल घोषित करण्यापूर्वी उर्वरीत प्रवेश शुल्काची वसूली करण्यात यावी.